IIP: WJHSS
IIP World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# भारत-चीन संबंधांतील धोरणात्मक बदल २०१४-२०२३ सीमावाद, सुरक्षा व राजनयाचे चिकित्सक विश्लेषण

[1]रामेश्वर लिंबाजी दिवटे, [2]प्रा.डॉ.मेघराज एकनाथ औटी

राज्यशास्त्र विभाग रा.ब.नारायणराव बोरावके महाविद्यालय श्रीरामपूर, अहिल्यानगर.

**Article Info**

***Article History:***

Received: 20th February 2026

Accepted: 01st March 2026

Published: 07th March 2026

***Keywords:***

*भारत-चीन संबंध, सीमावाद, राष्ट्रीय सुरक्षा, राजनय, धोरणात्मक बदल, गलवान डोकलाम संघर्ष, सामरिक स्वायत्तता.*

**ABSTRACT**

भारत-चीन संबंध हे प्राचीन काळापासून अस्तित्वात आहेत. या दोन्ही देशांना सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय व आर्थिक वारसा आहे. आधुनिक काळामधला या दोन देशांचा प्रवाससुद्धा काहीसा समांतर सुरू आहे. भारत-चीन संबंध हे आशियाई आणि जागतिक राजकारणातील अत्यंत गुंतागुंतीचे, बहुआयामी व दीर्घकालीन स्वरूपाचे संबंध मानले जातात ऐतिहासिक सीमावाद, भौगोलिक राजकारण, सामरिक स्पर्धा, आर्थिक परस्परावलंबन आणि आंतरराष्ट्रीय व्यवस्थेतील सत्तासंतुलन या घटकांनी हे संबंध सातत्याने प्रभावित झाले आहेत. 2014 ते 2023 हा कालखंड भारत-चीन संबंधाच्या दृष्टीने निर्णायक ठरला असून या काळात दोन्ही देशांच्या धोरणांमध्ये मूलभूत बदल घडून आले. सुरुवातीच्या टप्प्यात आर्थिक सहकार्य, बहुपक्षीय मंचावरील संवाद आणि राजनैतिक स्थैर्य यावर भर देण्यात आला; मात्र डोकलाम संघर्ष आणि विशेषतः गलवान खोरे संघर्ष यानंतर द्विपक्षीय संबंध तणावपूर्ण व सुरक्षा केंद्रित झाले.

या संशोधन लेखाचा मुख्य उद्देश २०१४ ते २०२३ या कालखंडातील भारत-चीन संबंधातील धोरणात्मक बदलांचा सीमावाद, राष्ट्रीय सुरक्षा आणि राजनय या तीन प्रमुख घटकांच्या आधारे चिकित्सक अभ्यास करणे हा आहे. या लेखात भारताच्या चीनविषयक धोरणात झालेल्या परिवर्तनाचा मागोवा घेतांना संलग्नतेच्या धोरणापासून रणनीतिक स्पर्धा व प्रतिरोध या दिशेने झालेल्या संक्रमणाचे विश्लेषण करण्यात आले आहे. गुणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करून शासकीय धोरणपत्रे, अधिकृत निवेदने, सीमावर्ती घटनांचे विश्लेषण तसेच तज्ञांचे संशोधन साहित्य यांचा वापर करण्यात आला आहे.

या कालखंडातील अभ्यासातून असे निष्कर्ष निघतात की, गलवान संघर्षानंतर भारताचे चीनविषयक धोरण अधिक वास्तववादी, सुरक्षा-केंद्रित आणि बहुपक्षीय झाले आहे. भारताने सीमावर्ती संरक्षण बळकट करणे, आर्थिक व तांत्रिक निर्बंध लादणे, तसेच QUAD व Indo-Pacific धोरणाद्वारे सामरिक संतुलन साधण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि, पूर्ण संघर्ष टाळत राजनैतिक संवाद सुरू ठेवण्याची भारताची भूमिका ही मर्यादित सहकार्य व नियंत्रित स्पर्धा या नव्या धोरणात्मक चौकटीकडे निर्देश करते. भविष्यात भारत-चीन संबंध हे पूर्ण सहकार्य किंवा पूर्ण संघर्ष न राहता स्पर्धा आणि संवाद यांच्या समांतर प्रक्रियेत विकसित होतील, असे या संशोधनातून स्पष्ट होते.

***Plagiarism Check Report:***

Date of Report: March 01, 2026

Similarity Index: 5%

Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Divte, R. L., & Auti, M. E. (2026). भारत-चीन संबंधांतील धोरणात्मक बदल २०१४-२०२३ सीमावाद, सुरक्षा व राजनयाचे चिकित्सक विश्लेषण. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), 1014–1018.

**प्रस्तावना :-**

भारत-चीन हे आशियातील दोन प्रमुख प्राचीन सभ्यता असलेले तसेच एकविसाव्या शतकातील उदयोन्मुख सामरिक शक्ती मानले जातात. भौगोलिक शेजारीपण, दीर्घ सीमारेषा, ऐतिहासिक अनुभव आणि प्रादेशिक वर्चस्वाची स्पर्धा यामुळे भारत-चीन संबंध नेहमीच संवेदनशील राहिले आहे. तसेच शीतयुद्धोत्तर काळात आर्थिक उदारीकरण, जागतिकीकरण आणि बहुपक्षीय सहकार्याच्या प्रक्रियेमुळे या संबंधांना नवे स्वरूप प्राप्त झाले.

2014 मध्ये भारतात सत्तातर झाल्यानंतर परराष्ट्र धोरणात सक्रियता, बहुपक्षीय सहभाग आणि आर्थिक विकासाला पूरक कूटनीती यांवर भर देण्यात आला. भारताने चीनसोबत व्यापार, गुंतवणूक आणि आंतरराष्ट्रीय मंचांवरील सहकार्य वाढविण्याचा प्रयत्न केला. **BRICS**, शांघाय सहकार्य संघटना (**SCO**) आणि **G-20** सारख्या मंचावर भारत-चीन संवाद अधिक सक्रिय झाला. या टप्प्यात असे मानले जात होते की, आर्थिक परस्परावलंबनामुळे सीमावादावर नियंत्रण ठेवता येईल आणि द्विपक्षीय संबंध स्थिर राहतील. मात्र, या आशावादी दृष्टिकोनाला चीनच्या वाढत्या आक्रमक  सीमावर्ती हालचालींमुळे आव्हान निर्माण झाले. 2017 मधील डोकलाम संघर्षाने भारत-चीन संबंधातील अंतर्गत विसंगती अधोरेखित केली. या घटनेने भारताला चीनच्या दीर्घकालीन सामरिक उद्दिष्टांविषयी अधिक जागरूक केले. तसेच 2018 आणि 2019 मध्ये झालेल्या अनौपचारिक शिखर परिषदांद्वारे दोन्ही देशांनी तणाव कमी करण्याचा प्रयत्न केला.

जून 2020 मध्ये लडाखमधील गलवान खोऱ्यात झालेला हिंसक संघर्ष हा भारत-चीन संबंधांतील निर्णायक वळण ठरला. या घटनेनंतर भारताच्या परराष्ट्र आणि सुरक्षा धोरणात मूलभूत बदल झाले. भारताने चीनकडे पाहण्याची दृष्टी अधिक वास्तववादी व सुरक्षा-केंद्रित केली. सीमावर्ती सैनिकी तयारी वाढविणे, चिनी गुंतवणूक व तंत्रज्ञानावर निर्बंध  लादणे, तसेच बहुपक्षीय सुरक्षा सहकार्य वाढविणे ही धोरणात्मक पावले उचलण्यात आली. या पार्श्वभूमीवर २०१४ ते २०२३ हा कालखंड भारत-चीन संबंधांसाठी संक्रमणाचा कालखंड ठरतो. या काळात भारताचे चीनविषयक धोरण संलग्नता आणि प्रतिरोध या दोन टोकांदरम्यान विकसित झाले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१) २०१४ ते २०२३ या कालखंडातील भारत-चीन द्विपक्षीय संबंधांचा ऐतिहासिक, राजनैतिक व धोरणात्मक परिप्रेक्ष्यातून आढावा घेणे.

२) भारत-चीन सीमावादाच्या स्वरूपात झालेल्या बदलांचे विश्लेषण करणे.

३) डोकलाम व गलवान संघर्ष यांचा भारताच्या सुरक्षा व परराष्ट्र धोरणावर झालेला प्रभाव अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधन हे गुणात्मक, विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक स्वरूपाचे आहे. या अभ्यासाचा उद्देश संख्यात्मक आकडेवारीपेक्षा धोरणात्मक विचारसरणी, निर्णयप्रक्रिया आणि राजनैतिक बदलांचे विश्लेषण करणे हा असल्यामुळे गुणात्मक

पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

हे संशोधन विश्लेषणात्मक, चिकित्सक व धोरण-केंद्रित असे असून, भारत-चीन संबंधांतील धोरणात्मक परिवर्तनाचा व सखोल अभ्यास करण्यावर भर देण्यात आला आहे. या संशोधनासाठी प्रामुख्याने दुय्यम स्रोतांचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये भारत सरकारचे परराष्ट्र मंत्रालय व संरक्षण मंत्रालयाचे वार्षिक अहवाल, भारत-चीन संबंधांवरील पुस्तके व संशोधन लेख, धोरणात्मक थिंक-टँक अहवाल, वृत्तपत्रे व अधिकृत निवेदने इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे.

२०१४ नंतर भारताने आपल्या शेजारी देशांसोबत संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न केले. याच प्रयत्नांचा भाग म्हणून सप्टेंबर २०१४ मध्ये चीनचे राष्ट्रपती भारतात आले.ज्या पद्धतीने मोदींनी चीनच्या राष्ट्रपतींचे स्वागत केले त्यावरून असे वाटले की, दोन्ही देशांमधील संबंध सुधारतील. या भेटीत कैलास मानसरोवर यात्रेसाठी नवीन मार्ग आणि रेल्वेमार्गाला संमती मिळाली. त्याचबरोबर १२ करारावर हस्ताक्षर करण्यात आले.

भारत-चीन संबंधामध्ये अविश्वास आणि एकमेकांबद्दल गैरसमजांचा एक धागा नेहमीच विणलेला होता. त्यात एकमेकांच्या सद्य नेतृत्त्वबद्दल असलेल्या दृष्टिकोनाचीही महत्त्वपूर्ण आणि उघड भर पडली. चीनला असे वाटते की, मोदी सरकार अधिक आक्रमक आहे. चीनच्या महत्त्वाच्या मुद्यांबद्दल त्याला फारसे गांभीर्य वाटत नाही आणि चीनच्या शत्रूची बाजू हे सरकार घेईल. भारत चीनकडे एक धोरणात्मक चिंता या दृष्टीने बघतो, कारण चीन स्वतःची धोरणे किंवा त्याच्या कृती यातून भारताला तसाच संदेश मिळतो, हे चीन मान्यच करत नाही. त्यांच्या आधीच्या सरकारांनी आखलेला चर्चा आणि संवादाचा मार्ग मोदींनीही खुला ठेवलेला आहे. या वास्तवाकडे चीनने कोणतेही महत्त्व दिलेले नाही असे दिसते. चीनबरोबर आपले मतभेद आहेत हे मोदींनी नाकारले नाही, उलट ते खुबीने मान्य केले आहेत. त्याचबरोबर भारताच्या मुख्य स्वारस्यांबद्दल ठामपणे बोलताना त्यात एक आत्मविश्वासही दिसतो. आणि ते अशाच वागणुकीची अपेक्षा समोरच्याकडूनही ठेवतात. त्यांच्या आधीच्या सत्ताधाऱ्यांच्या वागणुकीपेक्षा ही पद्धत मुळातूनच वेगळी आणि सकस आहे. मोदी मांडत असलेल्या या नवीन वास्तवाचा चीनला स्वीकार करता आलेला नाही, उलट त्याने जास्त गैरसमज करून घेतलेला आहे. याचे आणखी एक कारण असू शकते, की सन १९८८ पासून सन २०१४ पर्यंत चीन फक्त आघाडी सरकारां बरोबर चर्चाच्या फेऱ्या करत होता. पण, जे सरकार पूर्ण बहुमतात आहे ते परराष्ट्र धोरणात अधिक लवचीकपणा आणू शकते याची जाणीव चीनला झाली नसावी.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाला एक नुतन दिशा दिली, ज्यामुळे भारत चीनवर मर्यादा आणू पहात आहे ही चीनची समजूत आणखी घट्ट होत गेली. आधीच्या प्रशासनाने चीन-भारत संबंध अधिकाधिक मजबूत करण्यावर भर दिलेला होता, आणि मोदी सरकारलादेखील तसेच बळकटीकरण पुढेही करण्यात रस होता. पण इतर शेजारी देशांशी अधिक दृढ संबंध ठेवण्याचे भारताचे धोरण आणि अमेरिकेबरोबर भारताचे असलेले घनिष्ट संबंध यांकडे चीनकडून नकारात्मक दृष्टीने पाहिले गेले. याच गैरसमजुतीच्या आधारावर चीन भारताप्रती अधिकाधिक आक्रमक व्हायला लागला,ज्याचा परिपाक 2017 साली डोकलामच्या सीमेवर झालेला वाद आणि चीनच्या नौदलाची हिंद महासागरात वाढलेली हालचाल यात झाला. चीनच्या या कृतीमुळे भारतात असा समज वाढीस लागला, की भारताने प्रयत्न केले तरीही चीन भारताच्या आंतरराष्ट्रीय स्वारस्यांबद्दल संवेदनशील नाही. त्याचबरोबर चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्या सरकारबद्दलही भारतात नकारात्मक प्रतिमा

व्हायला लागली. 2013 साली शी जिनपिंग अध्यक्ष झाल्यानंतर चीन स्वत:चा वैश्विक ठसा जोरकसपणे निर्माण करायला लागल्यामुळे अमेरिका-चीन संबंध कमालीचे बिघडले आहेत आणि त्याचा परिणाम म्हणून भारत- चीन संबंधांमध्येही बरेच घर्षण अनुभवायला मिळालेले आहे. सीमेवर लहान प्रमाणात बळाचा वापर करत राहणे आणि भारताला प्रतिबंध करत राहणे हे आता चीनचे भारत-धोरण झाले आहे. २०२० साली वास्तविक नियंत्रण रेषेच्या बाजूने दोन्ही देशांमध्ये ज्या घडामोडी घडल्या, त्यामुळे भारताला धोरणात्मक स्पष्टता मिळाली. त्याने केलेल्या लष्करी बळाच्या वापराला भारत कधीच फारसा विरोध दर्शवणार नाही हे जे चीनचे गृहितक आहे, त्याचा चीनला फेरआढावा घ्यावा लागेल.

2014 पासून प्रत्यक्ष ताबा रेषेवर (LAC) सतत हालचाल सुरू असणारा हा या संबंधांमधला सर्वाधिक लांबीचा काळ आहे. अमेरिकेबरोबर धोरणात्मक संबंध भारत विकसित करत असतानाच हे होत आहे, हा योगायोग नाही. अमेरिकेबरोबर असलेल्या भारताच्या संबंधांवर चीनचे बारकाईने लक्ष असते आणि त्या दोघांमध्ये असणाऱ्या समन्वयाची त्याला चिंता वाटते. चीनी अभ्यासकांचे लेख आणि चीनकडून प्रसूत होणारी अधिकृत माहिती सतत सांगत राहते, की अमेरिका चीन विरोधी धोरण राबवत आहे आणि भारताने अमेरिकेपासून लोब रहावे. केटिअन झंग यांच्या मते, भू-राजकीय परिणाम फारसे होणार नाहीत, याची काळजी घेत LAC वर आक्रमण करून चीन भारताला धोक्याची जाणीव करून देत असतो.

भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात आपल्या अनुभवांआधारे नवीन धोरणात अनेक नवनवीन घटकांचा समावेश केला. विद्यमान मोदी सरकारने सामरिक बाजूचा समावेश त्यात केलेला आहे. भूतकाळात ज्या पद्धतीची धोरणे आखली जात होती, त्यापासून फारकत घेणारे हे मोदी सरकारचे परराष्ट्र धोरण आहे असे मत चीनच्या काही भागातून व्यक्त होत असले, तरी भारताच्या सर्व परराष्ट्र धोरणांमध्ये एक समान धागा सापडतो; आंतरराष्ट्रीय पातळीवर स्थान निर्माण करणे आणि अनेक पातळ्यांवर समन्वय साधणे.

भारताने 2018 पासून क्वाड आणि जे इतर बहुपातळी संबंध विकसित केलेले आहेत हे चीनने स्वीकारले आहे. ते त्यांच्या परराष्ट्र मंत्री वंग यी यांच्या टिप्पणीप्रमाणे समुद्रावरचा फेस नाहीयेत. क्वाडमुळे कदाचित युती अस्तित्वात येणार नाही, पण भारताचे भविष्यकालीन परराष्ट्र किंवा राष्ट्रीय सुरक्षा धोरण हे त्याच्या भूतकाळाच्या कामगिरीवर आधारित नसेल किंवा ते गृहितही धरता येणार नाही, याचे संकेत ठोसपणे देण्यासाठी हे उचललेले पाऊल महत्त्वाचे ठरते. भारत भविष्यकाळातही चीनच्या लष्करी आक्रमणांना प्रत्युत्तर कायमच कमी प्रमाणात असेल या चिनी विद्वानांच्या कल्पनेचीही फेरतपासणी व्हायला हवी. LAC लगत सशस्त्र सह-अस्तित्वाची परिस्थिती असेल असे भारताला अपेक्षित आहे. त्यासाठी लष्करी क्षमता वाढवण्याची त्याची तयारी आहे आणि त्यासाठी तो वचनबद्धही आहे. भारताच्या सद्य क्षमतेवर त्याच्या भविष्यकाळातल्या प्रत्युत्तराचा आणि वागणुकीचा अंदाज बांधणे योग्य होणार नाही.

**समारोप :**

चीन हा शत्रू आहे का भागीदार याबद्दल निर्णय घेणारे आणि धोरणकर्ते यामध्ये अस्पष्टता होती. तिची जागा आता धोरणात्मक स्पष्टतेने घेतलेली आहे. चीनची वागणूक शत्रुत्वाची आहे आणि त्याला संशयाचा फायदा देण्याची फार कमी जणांची

तयारी आहे. गलवान घटनेनंतर राष्ट्रीय पातळीवर चीनबद्दलचे मत बदलले आहे. राजकीय पातळीवर धोका पत्करण्याची तयारी निर्माण झालेली आहे. धोरणी संयम बाळगण्याच्या कल्पना बदललेल्या आहेत. त्याचमुळे 2022 मध्ये रेझांग ला / रेचिन ला इथे लेपर्डची कारवाई करण्यात आली. भारताने मुद्दामच हा मुद्दा लावून धरला आणि वाढवला, ज्याची चीनने अपेक्षा केली नव्हती. त्यामुळे LAC वर लहान प्रमाणात आक्रमणे करत राहिले, तरी त्याचा लगेच परिणाम होणार नाही, कारण भारत धोका पत्कारायला तयार नसतो, हे चिनी गृहितक आता वैध असेलच असे नाही.

**संदर्भ सूची:-**


1. पंत, एच. वी (2020) "इंडिया-चाइना रिलेशंस इन 2020: द रोड अहेड," जर्नल ऑफ एशियन सिक्योरिटी एंड इंटरनेशनल अफेयर्स
2. श्रीनिवासन, आर (2021), "द फ्यूचर ऑफ इंडिया-चाइना रिलेशन," फॉरेन अफेयर्स.
3. शौरी, ए. भारत-चीन संबंध, प्रभात पब्लिकेशन
4. शर्मा, एस. के. भारत चीन संबंध बदलता परिदृश्य, एविंसपन पब्लिशिंग
5. सिंह, आर. भारत-चीन नए रिश्ते नई राहें, डायमंड बुक्स लिमिटेड
6. कुमार, आर. भारत-चीन संबंध अतीत और वर्तमान, आकृति प्रकाशन
7. गुप्ता, एम.एल. भारत चीन कुटनीतिक संबंध, अटलांटिक पब्लिशर
8. पळसुले, व्ही. (2013) भारत आणि चीन संबंधांचे बदलते संदर्भ, परिवर्तनाचा वाटसरू
9. गोखले, व्ही (2021) गलवाननंतर: भारत-चीन संबंधाचे भविष्य.